# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTI DISCIPLINARY STUDIES

**Approved by : University Grant Commission (UGC)**

MONTHLY DOUBLE-BLIND PEER REVIEWED REFERRED OPEN ACCESS INTERNATIONAL JOURNAL

www.irjms.in

E-mail : irjms2015@gmail.com irjms.in@gmail.com

Volume-IV Special Issue - I ISSN : 2454-8499 January 2018

Impact Factor : 1.3599(GIF), 0.679 (IIFS)


## SPECIAL ISSUE ON
## बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा




Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh, Pune-67


IRJMS

Executive Editor
Prof. Tanaji Jadhav

Chief Editor
Dr. Mahendra Avaghade

348

Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh, Pune-67

## INDEX


| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Country/ State/City | Page No. |
|---|---|---|---|---|
| 1 | अत्रे यांच्या कथामधील सांस्कृतिक पर्यावरण | डॉ. जगदीश दिनकर शेवते | नसरापूर | 1 |
| 2 | सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी (ग्रामीण) कथा | बाळासाहेब शांताराम देविकर, डॉ. बाळकृष्ण लळीत | शिरूर | 4 |
| 3 | सांस्कृतीक पर्यावरण आणि मराठी कथा | प्रा.डॉ.रामीलाला सुदामराव पवार | तीर्थपुरी | 10 |
| 4 | विजया वाड यांच्या 'ऋणानुबंध' कथासंग्रहातील जेष्ठ नागरीकांचे प्रश्न | प्रा. डॉ. सौ. मंगल डोंगरे | नारायणगाव | 15 |
| 5 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा | प्रा. कांबळे विजया | पिरंगुट | 22 |
| 6 | मालवणी कथेतील स्त्री : सांस्कृतिक दर्शन | प्रा. डॉ. बाळकृष्ण रामचंद्र लळीत | शिरूर | 26 |
| 7 | 'सांस्कृतिक पर्यावरणातील घडामोडी आणि कथेतील वास्तव' | प्रा.डॉ.सुनील निगडे | वरवंड | 30 |
| 8 | सांस्कृतिक पर्यावरण आणि कथा : सहसंबंध | प्रा.डॉ. सुभाष दिनकर आहेर | पुणे | 35 |
| 9 | सदानंद देशमुखांच्या कथेमधील बदलते सांस्कृतिक पर्यावरण | प्रा. डॉ. सोमनाथ महादेव दडस | पुणे | 38 |
| 10 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि लेखकाची भूमिका. | डॉ. उमा काळे – माळी | पुणे | 46 |
| 11 | चारूता सागर यांचा कथेतील सांस्कृतिक पर्यावरण | प्रा.डॉ. प्रतिभा शंकर घाग | शिक्रापूर | 48 |
| 12 | सांस्कृतिक पर्यावरण आणि आदिवासी स्त्रियांची कथा | प्रा. डॉ भवारी हनुमंत लक्ष्मण | पाबळ | 52 |
| 13 | 'सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कथा' | प्रा. डॉ. ज्योती सुबराव माने | वरवंड | 59 |
| 14 | सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कथा | प्रा.वाडेकर छाया किसनराव | जालना | 63 |
| 15 | "सांस्कृतिक पर्यावरण–लोकगीते आणि स्त्रीजीवन एक अनुबंध...!" | प्रा. डॉ.मधुकर गणेश मोकाशी | राहू | 64 |
| 16 | "वैदु जमातीचा लोकसांस्कृतिक अनुबंध !" | प्रा. डॉ.मधुकर गणेश मोकाशी | राहू | 69 |
| 17 | सांस्कृतिक पर्यावरण आणि स्त्रीवादी कथा | प्रा.कल्पना तबाजी रोकडे | जेजुरी | 71 |
| 18 | बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी मुस्लिम कथा साहित्याच्या प्रेरणा | डॉ. पांडुरंग कंद | पुणे | 76 |

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि ...
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: ...

# सांस्कृतिक पर्यावरण आणि कथा : सहसंबंध

प्रा.डॉ. सुभाष दिवकर आहेर
प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,औंध, पुणे

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Aundh, Pune-67
Babasaheb Ambedkar Maha... Aundh, Pune

## १.१ प्रास्ताविक :-

साहित्य व समाज यांचा संबंध झाड व माती यांच्यासारखा असतो. साहित्यकलाकृती वाचून आस्वाद घेणारा वाचक, कलाकृती व लेखक हे तीन घटक साहित्याच्या आस्वादात महत्त्वपूर्ण मानले जातात. साहित्याची निर्मिती ही नवनिर्मिती असते. या साहित्याच्या निर्मितीवर तसेच वाचकाच्या आस्वादकतेवर आर्थिक, सामाजिक, वाङ्मयीन व सांस्कृतिक घटकांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या प्रभाव पडत असतो. लेखक कोणत्या प्रकारचे साहित्य लिहितो? आणि वाचक कोणत्या प्रकारचे साहित्य वाचतो? हे सर्वस्वी त्यांची जडणघडण व जीवन कोणत्या पर्यावरणीय परिप्रेक्ष्यात घडलेले आहे यावर अवलंबून असते.

## १.२ सांस्कृतिक पर्यावरण संकल्पना व स्वरुप :-

साहित्याचा जसा समाजीवनाशी संबंध असतो, त्याचप्रमाणे साहित्याचा संबंध संस्कृतीशीही असतो. समाजसापेक्ष सर्जनशील आविष्कार म्हणजे साहित्य होय. साहित्याचे लेखन करणारा लेखक व वाचन करणारा वाचक यांची जडणघडण समाजात होत असते. लेखक जी भाषा लेखनासाठी वापरतो ती भाषा एका अर्थाने समाजाचीच निर्मिती असते. आपण ज्या समाजात जन्माला येतो त्या समाजाची भाषा, जीवनपध्दती, संस्कृती, सामाजिक परंपरा, रुढी, रीतीरिवाज, विधिनिषेध या सर्वांचाच परिणाम त्या व्यक्तीवर होत असतो. समाज कधीही स्थिर नसतो. त्यात वेगवेगळ्या स्तरावर अनेक परिवर्तने होत असतात. या सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाचा परिणाम मानवी जीवनावर होत असतो. लेखक व वाचक ज्या परिसरात राहतात तेथील वाङ्मयीन, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक पर्यावरणाचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो. समाजजीवनात धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक घटना घडत असतात. त्याचाही परिणाम साहित्यावर होत असतो. या घटनांचे प्रतिबिंब साहित्यातून दिसत असते. साठोत्तरी साहित्याने वेगळा आशय चित्रित केला. महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील इ. च्या कार्यामुळे समाजजीवनात स्वातंत्र्याची, समतेची, शिक्षणाची ओढ निर्माण झाली. ग्रामीण व दलित साहित्यातून नवीन प्रश्नांची मांडणी झाली. यंत्रसंस्कृतीचे कृषीसंस्कृतीवर आक्रमण झाल्यामुळे नारबाचा गोतावळा कसा तुटला जातो याचे कारुण्यपूर्ण चित्रण आनंद यादवांनी 'गोतावळा' कादंबरीत केले. "समाजजीवनात निरनिराळ्या स्तरांतील संतांनी मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या इतिहासात जसे भक्तियुग निर्माण केले तसेच दलित व शोषित लेखकांनी त्यात क्रांतियुगाची निर्मिती केली. पारंपरिक मूल्य नाकारणे सोपे नसते. दलित साहित्याने ती नाकारली व नवा मूल्यकोश दिला."[1] म्हणूनच कोणत्याही कलाकृतीचा अभ्यास करताना कलाकृतीच्या निर्मितीचा कालखंड, त्या कालखंडातील समाजजीवन, सांस्कृतिक जीवन, समाजजीवनातील महत्त्वपूर्ण घटना, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक स्थिती यांचा परस्परसंबंध लक्षात घेणे आवश्यक आहे. साहित्य व समाज यांचा अतिशय जवळून संबंध असतो. "कोणत्याही काळातील साहित्यनिर्मितीचे केंद्र त्या तया काळातील सांस्कृतिक कोंदणाशी साकल्याने अनुबंधित असते. सामान्यतः कोंदणाकडून केंद्राकडे आणि केंद्राकडून कोंदणाकडे हा प्रवास उलटसुलट गतीने चालू असतो. त्यावर पूर्वकालीन निर्मितीचाही एक संस्कार कमी



350

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

अधिक प्रमाणात उमटलेला असतो."[२] दररोजच्या जीवनाचे अनुबंध वाचक साहित्यात शोधत असतो. लेखक व वाचक यांचे सभोवतालच्या सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाशी एक नाते असते. सामाजिक विचारसरणी व साहित्यनिर्मिती यांचाही जवळचा संबंध आहे. विशिष्ट सामाजिक परस्थितितीत एक विचारप्रणाली प्रसृत होते. त्या काळात घडलेल्या सामाजिक, सांस्कृतिक घटना या विचारप्रणालीची जडणघडण करत असतात. त्यातूनही साहित्याची निर्मिती होते. आंबेडकरवाद, गांधीवाद, मार्क्सवाद, स्त्रीवाद या विचारप्रणालींनी (इझम) लेखकांना साहित्यनिर्मिती प्रेरणास्त्रोत पुरवलेले आहेत. दलित साहित्य व आंबेडकरवाद, ग्रामीण साहित्य व गांधीवाद, कामगार साहित्य व मार्क्सवाद, स्त्रीवादी साहित्य व स्त्रीवाद या साहित्यप्रवाहांचा व विचारप्रणालींचा सहसंबंध ज्ञातच आहे. म्हणूनच एखादया साहित्यप्रवाहाचा अभ्यास करताना त्या साहित्याच्या सांस्कृतिक परंपरा व सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरण याचीही जाणीव ठेवली पाहिजे.

**१.३ सांस्कृतिक पर्यावरण व कथा सहसंबंध :-**

साहित्य व इतर कला या समाजाची सांस्कृतिक गरज भागविणारी निर्मिती आहे. समाजाने साहित्याचा वापर अनेक हेतूने केलेला आढळतो. उदा. ज्ञान, मनोरंजन, मतांचा प्रसार, धार्मिक प्रसार, पक्षप्रचार इ. "समाजाच्या त्या त्या अवस्थेत विवक्षित आशय आणि तंत्रे यांची उपलब्धी साहित्यिकाला होत असते. यमुनापर्यटन, पण लक्षात कोण घेतो, शारदा या साहित्यकृतींचा संबंध विशिष्ट सांस्कृतिक पर्यावरणाशी आहे. खाडिलकरांच्या कीचकवध सारख्या नाटकाचे आणि काळाचे विवक्षित नाते आहे."[३] प्रत्येक काळातील काही महत्त्वपूर्ण घटनांनी मानवी जीवन ढवळून निघालेले आहे. उदा. नव्वदोत्तरी कथासाहित्यात नवीन आशय वाचावयास मिळतो. आज समाजात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक असे विविध प्रश्न दिसतात. उदा. तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेला माणूस, दशहतवाद, चंगळवादी संस्कृती, स्त्रीपुरुषातील अनैतिक संबंध, महिलांवर होणारे अत्याचार, जातीय विषमता इ. आज ज्या सांस्कृतिक पर्यावरणात आपण रहात आहोत त्या जीवनाचे प्रश्न आपल्या कथेतून मांडण्याचा प्रयत्न आजच्या कथाकारांनी केला पाहिजे. समकालीन प्रश्नांना भिडणारे साहित्य लेखकाने लिहिले पाहिजे.

विभावरी शिरुरकरांनी 'कळयांचे निःश्वास' या कथासंग्रहातून स्त्रीमनाचे सखोल विश्लेषण केले. सामाजिक समस्या व रुढी परंपरा यामुळे तरुण मुली, स्त्रियांची झालेली परवड या कथासंग्रहातून चित्रित केलेली आहे. स्त्रीजीवनातील वैवाहिक समस्या, जातीच्या बाहेर लग्न करणे गैर आहे का? असे प्रश्न या कथांतून मांडलेले आहेत. अरविंद गोखले यांच्या कथेतून विविध जातीची माणसे भेटतात. महायुद्ध, बेकारी, चलेजाव आंदोलन, जातीय दंगली, फाळणी इ. अनेक घटनांची त्यांच्या कथांना जोड लाभलेली आहे. गंगाधर गाडगीळांच्या कथेतून मध्यवर्गीय समाजाच्या जीवनात निर्माण झालेली भकास पोकळी जाणवते. उदा. किडलेली माणसे, सुखी माणसे इ. कथा. त्यांच्या कथेतून समकालीन जीवनाची उद्ध्वस्तता, किडलेपणा, हिणकसपणा चित्रित झालेला आहे. दिलीप चित्रे आणि ह.मो. मराठे यांनी मध्यमवर्गीय जीवनातील दांभिकपणा कथेतून चित्रित केलेला आहे. भास्कर चंदनशीव यांच्या अनेक कथा दलित, स्त्रीवादी, ग्रामीण, जनवादी साहित्याशी नाते सांगणाऱ्या आहेत. याचे कारण म्हणजे भास्कर चंदनशिव यांचे पदव्युत्तर शिक्षण मिलींद महाविद्यालयात झाले. तेथील सांस्कृतिक पर्यावरणाचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झाल्याचे दिसते. त्यांची कथा शेतकऱ्यांचे दारिद्र्य, ग्रामीण भागातील जातीय ताण तणाव चित्रित करते. नव्या परीवर्तनाला सामोरे जाणारी त्यांची कथा आहे. याचा प्रत्यय जांभळढव्ह,


351

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

मरणकळा, अंगारमाती, नवी वारुळं, बिरडं आदी कथासंग्रहातून येतो.

गौरी देशपांडे यांच्या कथेतून स्वच्छंदवादी व स्वतंत्रपणे जीवन जगणारी स्त्री दिसते. सामाजिक संकेतांना झुगारुन त्या जीवन जगल्या. देशविदेशात भ्रमंती, विविध संस्कृतीचे संस्करण, स्वतंत्र विचार करण्याची पध्दती यामुळे त्यांच्या साहित्यावर, पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव जाणवतो. 'आहे हे असे आहे' या त्यांच्या कथासंग्रहातून स्त्रीपुरुष संबंधातील खोटेपणा, दांभिकपणा यावर त्यांनी भाष्य केले आहे. 'कावळा चिमणीची गोष्ट' या कथेतून कावळ्याची पुरुषी मानसिकता, आताचे स्त्रीपुरुष संबंध यांवर उपरोधीकपणे भाष्य केलेले आहे.

मिलिंद बोकील यांच्या उदकाचिया आर्ती, झेन गार्डन या कथासंग्रहातून धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रश्न, स्त्री पुरुष नात्यातील व्यक्तिस्वातंत्र्य, समाजकार्यासाठी झटणारे कार्यकर्ते यासारखे विषय मांडलेले आहेत. प्रिया तेंडुलकर यांचे 'जन्मलेल्या प्रत्येकाला, ज्याचा त्याचा प्रश्न आणि जावे त्यांच्या वंशा हे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. महानगरीय जीवनाचा वेग, जागेच्या समस्या, बकालपणा, प्रचंड गर्दीतील एकटेपणा असे आशयविश्व त्यांच्या कथेतून येते. दलित कथेतून त्या त्या काळातील सांस्कृतिक पर्यावरणाचे, त्यातील महत्त्वाच्या घटनांचे उल्लेख आलेले दिसतात. बाबुराव बागुल यांच्या मरण स्वस्त होत आहे, जेव्हा मी जात चोरली या कथासंग्रहातून व सूड कथेतून सांस्कृतिक पर्यावरणातील घडामोडींचे मोठ्या प्रमाणात चित्रण आलेले आहे. माणसाचे जगणे, दारिद्र्य, गरिबी, स्त्रीजीवन, व्यसनाधीनता, समाजातील जातीय हेवेदावे या सर्वांचे चित्रण बाबुराव बागूल यांच्या कथेतून आलेले आहे. अध्यात्म मार्गातही स्त्रीकडे बघण्याची पुरुषी वृत्ती 'सूड' मधून वाचकाच्या लक्षात येते.

प्रा. वृषाली मगदूम यांचे विराणी गाणी, साकव, कोलाज, डोहविभ्रम इ. कथासंग्रह प्रसिध्द आहेत. स्त्रीजीवनाचे सूक्ष्म अवलोकन, प्रत्यक्षात स्त्रीविकाससंदर्भात कार्य करणाऱ्या सामाजिक संघटनेच्या त्या कार्यकर्त्या आहेत. स्त्रीवर्गाचे यातनामय जीवन, भौतिक सुखाच्या पलीकडे असणारे रितेपण व विवशता, स्त्री पुरुष संबंधातील व्यामिश्रता याचे दर्शन त्यांच्या कथासंग्रहातून दिसते. एड्सला बळी पडलेल्या दुर्दैवी स्त्रिया, भ्रष्टाचाराशी संबंधित माणसे , मातृत्वविषयक कथा, प्रौढ कुमारिकांचे प्रश्न, घटस्फोटाचे प्रश्न, घरातील व्यक्तींचीच स्त्रियांवर असणारी वासनामय नजर, घटस्फोटामुळे होणारी अपत्यांची मानसिक स्थिती अशा अनेक अंगांनी स्त्रीजीवनाचे भावविश्व प्रा. वृषाली मगदूम यांनी उलगडून दाखविले आहे.

थोडक्यात मानवी जीवन हे फारच गतिमान झाले आहे. दररोजच्या जीवनात असंख्य घटनांची मालिका निर्माण होत असते. त्यामुळे त्याचे जीवन कधी कधी अस्थिर होऊन जाते. सांस्कृतिक पर्यावरणात या सर्व घडामोडींचा समावेश होतो. याचा लेखकाला वेध घेता आला पाहिजे.

**१.४ समारोप :-**

समाजात विविध घटना घडत असतात. या सामाजिक व सांस्कृतिक घटनांचे साहित्यावर परिणाम होत असतात. कधीकधी हे परिणाम लगेच जाणवतात. तर कधी ते यथावकाश जाणवतात. काही वेळा या सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन करणाऱ्या घटनांचे भांडवल करुन वेगळ्या प्रकारचे साहित्य लिहिले जाण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. लेखकाने साहित्यनिर्मिती करताना त्या प्रदेशातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटनांचाही अभ्यास करावा. साहित्यनिर्मितीची प्रेरणा ही नि:संशयपणे सामाजिक



Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES
SPECIAL ISSUE ON बदलते सांस्कृतिक पर्यावरण आणि मराठी कथा
Vol. 4, Special Issue 1, January, 2018 | ISSN (Online): 2454-8499 Impact Factor: 1.3599(GIF), 0.679(IIFS)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

अस्तित्वातून निर्माण झालेली असते.

संदर्भटीपा :-

१. जर्नादन वाघमारे, 'साहित्यचिंतन', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९२, पृ. ८३.
२. गो. म. कुलकर्णी, 'आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ., १९९४, प्रास्ताविक.
3. डॉ. यशवंत मनोहर, 'नवे साहित्यशास्त्र', विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ., २००१, पृ. २४८.

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya * Aundh, Pune-67 *

## सदानंद देशमुखांच्या कथेमधील बदलते सांस्कृतिक पर्यावरण



353